महाज्योती

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
ई मेल mahajyotingp@gmail.com
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405

दिनांक :- 21/08/2023

जा.क्र. महाज्योती, नागपूर/ आस्था/ 1573 /2023-24,

## मिलीटरी भरती परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता परिपत्रक

महाज्योती या संस्थेद्वारे मिलीटरी भरती परीक्षा पुर्व ऑफलाईन प्रशिक्षण- 2023 करीता दि.11/08/2023 रोजी पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच पात्र विद्यार्थ्यांना दि.17/08/2023 रोजी पर्यंत प्रशिक्षण केंद्र निवड करण्याकरीता मुदत देण्यात आली होती. त्यानुसार एकूण-503 विद्यार्थ्यानी प्रशिक्षण केंद्राचे पर्याय निवडले. त्यापैकी उर्वरीत विद्यार्थ्यांना मेरीटप्रमाणे व उर्वरीत जागांप्रमाणे प्रशिक्षण केंद्र देण्यात आलेले आहे. दि.01/09/2023 पासून प्रशिक्षण सुरु करण्यात येत आहे. त्यामुळे दि.31/08/2023 पर्यंत विद्यार्थ्यांनी निवड केलेल्या प्रशिक्षण केंद्रास प्रवेश प्रक्रीया पूर्ण करुन घ्यावी.

प्रवेश प्रक्रीयेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:-

1. आधारकार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र
3. वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
4. एच.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका / प्रमाणपत्र/ उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र

- **प्रशिक्षण केंद्रांचे नाव व पत्ता-संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे:-**

**सीआरजी ॲकडमी पुणे येथील प्रशिक्षण केंद्र-**

**राहूल जाधव**- 7666878067/9923268491
**पत्ता**- 3 रा माळा, फाडके हॉल, खजीना वीर चौक, क्रांतीवीर वासूदेव फाडके मार्ग, सदाशिव पेठ, पुणे - 411030

**UPSC ॲकडेमीया पुणे येथील प्रशिक्षण केंद्र-**

**राहूल खंडारे**- 7666818376/9960339044
**पत्ता**- शानब्रम्हा कॉमप्लेक्स, 3 रा माळा, फरसखाना पोलीस स्टेशन च्या पुढे ABC चौक, पुणे - 411002

**ज्ञानज्योती स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र-**

**विशाल भेंडुरकर**- 9975806127/7887992834/5

**पत्ता**- विठ्ठल प्रसाद बिल्डींग, अल्का टॉकीज जवळ, सदाशिव पेठ, पुणे -411030

- प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल याची नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांना MPSC/UPSC किंवा महाज्योतीच्या इतर योजनांचा लाभ घ्यायचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रकीया करु नये. तसेच प्रवेश प्रक्रीया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता निवड करता येणार नाही.
- कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी' या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- सदर संस्थांमध्ये दि.31/08/2023 पर्यंत तात्पुरत्या निवड यादीतील विद्यार्थी रुजु न झाल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना रिक्त जागेवर संधी मिळेल.
- कोणत्याही कारणाने परीक्षा केंद्रात बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर